महाराष्ट्र शासन

क्र. प्रआयो-२०१८/प्र.क्र. २५६/यो-१०,
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दि. १९ नोव्हेंबर, २०१८.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

विषय:- ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करावयाच्या धोरणांतर्गत संगणकीय प्रणालीवरील नोंदीबाबत.

संदर्भ:- १. शासन परिपत्रक क्र. प्रआयो-२०१८/प्र.क्र. २५६/यो-१०, दि.२०.८.२०१८.
२. शासनाचे सम क्रमांक दि. ०५.११.२०१८ चे पत्र.

ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करावयाच्या धोरणांतर्गत संदर्भाधिन शासन परिपत्रक क्र. १ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून त्याकरिता संगणक प्रणालीमध्ये संदर्भाधिन शासन पत्र क्र. २ अन्वये अतिक्रमणाबाबतची डेटा एन्ट्री करण्यासाठी दि. १५.११.२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती. या पत्रान्वये पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येत आहे.

१. संगणक प्रणालीवर अतिक्रमण धारकांच्या दि. १५.११.२०१८ पर्यंत झालेल्या डेटा एन्ट्रीबाबत ग्रामसेवक व विस्तार अधिकारी/गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या लॉगीन मधून दि. २०.११.२०१८ पर्यंत सर्व नोंदी प्रमाणित कराव्या.

२. ज्या ग्राम पंचायतीमधील दि. १५.११.२०१८ पर्यंत झालेल्या सर्व अतिक्रमण धारकांच्या डेटा एन्ट्रीच्या नोंदी प्रमाणित झालेल्या आहेत त्या ग्रामपंचायतींनी दि. २२.११.२०१८ रोजी संगणक प्रणालीमधून अतिक्रमण धारकांची यादी उपलब्ध करुन ग्रामपंचायतीच्या ठळक/दर्शनी भागात लावून व ग्रामपंचायतींसबंधी वेबसाईटवर अपलोड करुन सूचना व आक्षेप मागविण्यासाठी व्यापक प्रसिध्दी द्यावी.



Scanned by CamScanner

३. या यादीवर आक्षेप/हरकती व सूचना नोंदविण्यासाठी १५ दिवसांची म्हणजेच दि. ०७.१२.२०१८ पर्यंत मुदत असेल. ज्यांना आक्षेप/हरकती व सूचना नोंदवायच्या असतील त्यांनी सोबत जोडलेल्या परिशिष्ट - ब मध्ये नोंदवाव्यात. ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांनी सदर परिशिष्ट - ब मधील प्राप्त आक्षेप/हरकती व सूचनांची पडताळणी करावी व त्यावर स्वाक्षरी करुन त्याची एक प्रत संगणक प्रणालीवर नोंद घेण्याकरिता केंद्र चालकाकडे द्यावी. केंद्र चालकाने वरील परिशिष्ट - ब प्रमाणे आक्षेप/हरकती व सूचनांची नोंद संगणक प्रणालीवर घ्यावी व ग्रामसेवक आणि विस्तार अधिकारी/गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या लॉगिन मधून सदर नोंदी प्रमाणित कराव्यात.

४. यादी प्रसिध्दीच्या कालावधीत म्हणजेच दि. ०७.१२.२०१८ पर्यंत राज्यातील सर्व ग्रामसेवकांनी दि. ०१.०१.२०११ पूर्वीच्या अतिक्रमण धारकांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी (Spot Verification) करुन अहवाल सोबत जोडलेल्या परिशिष्ट - क मध्ये तयार करावा व ग्रामपंचायत दप्तरी ठेवावा.

५. ज्या अतिक्रमण धारकांची दि. १५.११.२०१८ पर्यंत संगणक प्रणालीमध्ये नोंद झालेली नाही त्याबाबत आक्षेप/हरकती व सूचना असल्यास नागरिकाकडून परिशिष्ट - ब मध्ये घेण्यात याव्यात. तसेच ग्रामसेवकाने सदर अतिक्रमणाबाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन परिशिष्ट - क प्रमाणे अहवाल तयार करावा व त्याची संपूर्ण तपशिलवार माहिती संदर्भ क्रमांक १ येथील शासन परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट - अ प्रमाणे तयार करुन परिशिष्ट - अ, ब व क ग्रामपंचायत दप्तरी ठेवावा. याबाबत यथावकाश सूचना निर्गमित करण्यात येतील.

आपला,

(वि.द.शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत:- परिशिष्ट- ब व परिशिष्ट- क

प्रत,

१) संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी मुंबई.
२) प्रोजेक्ट मॅनेजर, सीएससी ई-गव्हर्नन्स इंडिया, प्रा. लि.

Scanned by CamScanner

# परिशिष्ट-ब

## शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ झालेल्या अतिक्रमणाबाबत.
## नागरिकांच्या आक्षेप/हरकती व सूचना

अतिक्रमण धारकाचे नाव :- श्री./श्रीमती. ____________________

भुमापन क्र./ सिटी सर्व्हे क्र.:-__________ जमिनीचा प्रकार - गायरान/गावठाण/सार्वजनिक वापराची जमिन/ इतर शासकीय जमिन

ग्रामपंचायतीचे नांव -__________ गावाचे नांव -__________

आक्षेप/हरकती व सुचना करणाऱ्या नागरिकाचे नांव -__________

लिंग - पुरुष /स्त्री / इतर मोबाईल क्र.- __________

आधार क्र.- __________ ई-मेल - __________

पत्ता -__________

**नागरिकांच्या सूचना (लागु असलेल्या पर्यायावर ☑ खुण करावी )**

- ☐ सध्या ज्या ठिकाणी अतिक्रमण आहे त्याच ठिकाणी अतिक्रमण नियमानुकूल करावे. (Insitu).
- ☐ अतिक्रमणाचे पर्यायी जागेत पुनर्वसित करावे. (Exsitu).
- ☐ अतिक्रमण जागेचा आराखडा तयार करुन अतिक्रमण नियमानुकूल करावे. (Layout in insitu).

**नागरिकाचे आक्षेप (लागु असलेल्या पर्यायावर ☑ खुण करावी )**

- ☐ अतिक्रमण धारकाचे नाव चुकीचे आहे
- ☐ गावाचे नाव चुकीचे आहे.
- ☐ अतिक्रमणाचे वर्ष चुकीचे आहे
- ☐ अतिक्रमण केलेल्या जागेचे क्षेत्रफळ चुकीचे आहे.
- ☐ प्रचलित वर्षांचा जमिनीचा दर चुकीचा आहे.
- ☐ जमीन वापराचा प्रकार चुकीचा आहे.
- ☐ परिशिष्ट अ चुकीचे अपलोड केले आहे.
- ☐ मिळकत क्रमांक चुकीचा आहे
- ☐ अतिक्रमित कुटूंबातील सदस्यांची माहिती चुकीची आहे
- ☐ अतिक्रमण गावठाणामध्ये आहे/नाही
- ☐ अतिक्रमण केलेले नाही
- ☐ भूमापन क्रमांक/गावठाण चुकीचे आहे
- ☐ नमुना क्र. ८ एंट्री २०१७-१८/२०१०-११/१९९९-२०००

आक्षेप व सूचनाबाबत सविस्तर माहिती :- ____________________

____________________

____________________

____________________

दिनांक :- नागरिकाची स्वाक्षरी :-

---

कार्यालयीन वापरासाठी

ग्रामसेवक स्वाक्षरी :- विस्तार अधिकारी स्वाक्षरी :-



Scanned by CamScanner

## परिशिष्ट-क

## शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ दि. ०१/०१/२०११ पूर्वीच्या अतिक्रमणाच्या स्थळ पाहणीबाबत अहवाल.

ग्रामपंचायतीचे नांव -____________________ गावाचे नांव -____________________

तालुका - ____________________ जिल्हा -____________________

स्थळ पहाणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव -____________________

पदनाम -____________________

अतिक्रमण धारकाचे पूर्ण नांव -____________________

सध्या अतिक्रमित घरात/जागेत अतिक्रमण धारक वास्तव्यास ☐ आहे ☐ नाही

असल्यास, सध्यस्थितीत वास्तव्यास असणाऱ्या व्यक्तीचे नांव -____________________

लिंग - ☐ पुरुष/ ☐ स्त्री/ ☐ इतर मोबाईल क्र.- ____________________

आधार क्र.- ____________________ ई-मेल - ____________________

अतिक्रमणाचे ठिकाण - गावठाण ☐ गावठाणाबाहेर ☐

जमिनीचा प्रकार गायरान ☐ गावठाण ☐ सार्वजनिक वापरातील जमिन ☐ प्रशासकीय विभागाची जमिन असल्यास विभागाचे नाव ☐

भूमापन क्र./सिटी सर्वे क्र. असल्यास - ____________________ अतिक्रमित घराचा मिळकत क्र.-____________________

अतिक्रण केल्याचा वर्ष -____________________ महिना वर्ष -____________________

प्रत्यक्ष स्थळ पहाणी दरम्यान अतिक्रमीत जागेचे क्षेत्रफळ (चौ.फुट) - ____________________

१.अतिक्रमीत जागेचे एकूण क्षेत्रफळ (चौ.फुट) - लांबी (फुट) X रुंदी (फुट) = एकूण क्षेत्रफळ (चौ.फुट)

२.एकूण अतिक्रमीत जमिनी पैकी निवासी प्रयोजनासाठी वापरातील क्षेत्रफळ (चौ.फुट) -____________________

३.एकूण अतिक्रमीत जमिनी पैकी असल्यास व्यवसायीक प्रयोजनासाठी वापरातील क्षेत्रफळ (चौ.फुट) -____________________

४.एकूण अतिक्रमीत जमिनी पैकी असल्यास औद्योगिक प्रयोजनासाठी वापरातील क्षेत्रफळ (चौ.फुट) -____________________

अतिक्रमीत कुटूंबातील व्यक्तीचे नावे ग्रामपंचायत क्षेत्रात घर ☐ आहे ☐ नाही

असल्यास, कुटूंबातील ज्या सदस्याच्या नावे घर आहे त्याचे नाव :-____________________

अतिक्रमीत कुटुंबातील सदस्याचा घराचा मिळकत क्रमांक -____________________

**अतिक्रमीत जागेबाबत ग्रामसेवकाचे अभिप्राय :-**

१. प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता निवासी प्रयोजनासाठी __________ चौ.फुट व व्यावसायिक / औद्योगिक प्रयोजनासाठी __________ चौ.फूट असे एकूण __________ चौ.फूट अतिक्रमण आहे त्या ठिकाणी नियमानुकूल करता येईल (Insitu) उर्वरित जागेवरील अतिक्रमण निष्कासित करण्यात यावे.

२. अतिक्रमणधारकाचे पर्यायी जागेत पुनर्वसन करणे योग्य राहील. (Exsitu).

३. अतिक्रमण जागेचा आराखडा तयार करुन अतिक्रमण नियमानुकुल करणे योग्य राहील (Layout in insitu).

दिनांक :- ग्रामसेवक स्वाक्षरी :-

Scanned by CamScanner